ePaper

## अमेरिकेशी युद्ध की शांतता? इराणचा अंतिम निर्णय कोण घेतं?



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™


पान 3 वरुन...

१० कचरा प्रक्रिया केंद्रांचा मार्ग खडतर

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 20 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## अनेक ठिकाणी संपर्क तुटला; २० जणांचा दुर्दैवी मृत्यू

# उत्तर भारतात पावसाचा हाहाकार!

महाईन्यूज I कोलकाता

**उत्तर बंगाल आणि शेजारील सिक्कीममध्ये गेल्या २४ तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. डोंगराळ भागात दरडी कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. तर मैदानी भागात अचानक पूर आणि पाणी साचल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.**

भारतीय हवामान विभागाने (IMD) पुढील ४८ तास उत्तर बंगाल आणि सिक्कीममध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. दार्जिलिंग, जलपाईगुडी, कालिम्पोंग आणि अलीपूरद्वार जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी २०० मिलिमीटरपेक्षा अधिक पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. सिक्कीममधील अनेक भागांतही मुसळधार ते अतिवृष्टीचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

सततच्या पावसामुळे डोंगराळ भागातील रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामांना फटका बसला आहे. पूर्व सिक्कीममधील रंगपो-सिंगटम मार्गावरील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १० (NH-10) वर अनेक ठिकाणी दगड आणि माती कोसळत असल्याने वाहतुकीवर परिणाम झाला आहे. बार्डंग परिसरात गेल्या आठवड्यात झालेल्या मोठ्या दरडीच्या घटनेनंतर हा मार्ग आधीच धोकादायक बनला असून, नव्या पावसामुळे परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे.

मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी दृश्यमानता कमी झाली असून, रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. तसेच चहा मळे, शेती आणि फलोत्पादनालाही फटका बसण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. हवामान विभागाने नागरिकांना अनावश्यक प्रवास टाळण्याचे, नदी-नाल्यांपासून दूर राहण्याचे आणि वीजांच्या कडकडाटाच्या वेळी सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्याचे आवाहन केले आहे. पुढील दोन दिवस खराब हवामान कायम राहण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवली असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.











### २०० मिमीपेक्षा अधिक पावसाचा इशारा

उत्तर बंगाल आणि सिक्कीममध्ये पुढील ४८ तास मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. दार्जिलिंग, जलपाईगुडी, कालिम्पोंग आणि अलीपूरद्वार जिल्ह्यांत २०० मिमीपेक्षा अधिक पाऊस पडण्याची शक्यता असून, भूस्खलन, अचानक पूर, वीजांचा कडकडाट आणि वाहतूक विस्कळीत होण्याचा धोका व्यक्त करण्यात आला आहे. नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळून प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नवी मुंबईच्या धर्तीवर 'नवे पुणे'

## पुरंदरमध्ये शहराचा नियोजित विस्तार करावा; नितीन गडकरींची सरकारला सूचना

**महाईन्यूज । पुणे**

**'पुणे शहरावरील लोकसंख्येचा आणि वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेता, नवी मुंबईच्या धर्तीवर पुरंदर तालुक्यात ' नवे पुणे ' विकसित करण्याचा विचार राज्य सरकारने करावा,' अशी महत्त्वपूर्ण सूचना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी केली. पुण्याचा नियोजित विस्तार करण्याची ही योग्य वेळ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**



'देशातील काही शहरांमध्ये लोकसंख्येची वाढ मर्यादित ठेवण्याचा विचार करावा लागेल; अन्यथा रस्ते आणि पूल कितीही बांधले, तरी भविष्यात रस्त्यावर चालणेही कठीण होईल. त्यामुळे पुरंदरच्या दिशेने नव्या पुण्याचा विकास करणे आवश्यक आहे,' असे गडकरी म्हणाले.

पुणे-शिरूर, हडपसर-यवत आणि तळेगाव-शिक्रापूर या तीन उन्नत महामार्गांची उभारणी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने करण्यात येणार असल्याचे गडकरी यांनी सांगितले. 'भारतीय रस्ते काँग्रेसच्या निकषानुसार दोन खांबांमधील अंतर ३० मीटर असते; मात्र मलेशियातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या प्रकल्पांमध्ये हे अंतर १२० मीटर ठेवले जाणार आहे. त्यामुळे खांबांची संख्या कमी होऊन प्रकल्पाचा खर्चही कमी होणार आहे. या मार्गांमध्ये तळाला सामान्य रस्ता, त्यावर उड्डाणपूल आणि सर्वांत वर मेट्रो मार्ग अशा त्रिस्तरीय रचनेचा अवलंब करण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यातील वाहतूक गरजांचा विचार करून दर्जेदार पायाभूत सुविधा उभारल्या जातील,' असे त्यांनी नमूद केले.

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (एनएचएआय) माध्यमातून पुणे परिसरात सुमारे ५० हजार कोटी रुपयांच्या रस्ते प्रकल्पांना वर्षभरात गती मिळणारआहे. प्रकल्पांमुळे वाहतूक कोंडी कमी होईल, प्रवासाचा वेळ वाचेल आणि प्रदूषणातही घट होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्य सरकारने विविध स्तरांवर सहकार्य केल्यामुळे या प्रकल्पांना गती मिळाल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री आणि राज्य सरकारचे आभार मानले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी नाशिक फाटा-खेड महामार्गाला मंजुरी देण्याची गरज भाषणात मांडली. त्यावर उत्तर देताना गडकरी म्हणाले, 'या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया तयार आहे. मात्र, वित्त विभागाने शंभर टक्के भूसंपादन झाल्याशिवाय काम सुरू करता येणार नसल्याचे नमूद केले आहे. उर्वरित भूसंपादन पूर्ण होताच पुढील काही दिवसांत या प्रकल्पालाही सुरुवात केली जाईल.'

### प्रवासात वेळ वाचणार

'शिरूर ते छत्रपती संभाजीनगर या सुमारे १५ हजार कोटी रुपयांच्या महामार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम सुरू आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुणे-छत्रपती संभाजीनगर प्रवास अवघ्या दोन तासांत, तर छत्रपती संभाजीनगर-नागपूर प्रवास अडीच तासांत होईल. त्यामुळे पुणे-नागपूर हे अंतर सुमारे साडेचार तासांत पार करणे शक्य होईल,' असे गडकरी यांनी सांगितले. या महामार्गातील काही अडचणींबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली असून, त्यावर लवकरच मार्ग काढला जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

# पुण्यात नव्या बोगद्याने सिंहगड-सातारा रस्ता जोडणार

**महाईन्यूज । पुणे**

**नरवीर तानाजी मालुसरे रस्ता (सिंहगड रस्ता) आणि सातारा रस्ता यांना थेट जोडणाऱ्या हिंगणे-धनकवडी बोगदा प्रकल्पासाठी महापालिकेकडून निविदा प्रक्रिया लवकरच राबविण्यात येणार आहे. बोगद्याचा सविस्तर प्रकल्प आराखडा (डीपीआर) तयार झाला असून, त्यावर अंतिम हात फिरवण्यात येत आहे.**



हिंगणे (सिंहगड रस्ता) ते धनकवडी (सातारा रस्ता) या मार्गादरम्यान तळजाई टेकडीमुळे वाहनांना थेट जा-ये करता येत नाही. त्यामुळे नागरिकांना स्वारगेट किंवा कात्रजमार्गे साडेसात ते नऊ किलोमीटरचा वळसा घालावा लागतो. या प्रवासासाठी साधारण ४० ते ५० मिनिटे लागतात. ही अडचण दूर करण्यासाठी महापालिकेने हिंगणे-तळजाई-धनकवडी बोगदा प्रकल्प प्रस्तावित केला आहे. या बोगद्याचा डीपीआर तयार झाला आहे. उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, लवकरच निविदा प्रसिद्ध करण्यात येणार असून, शक्य तितक्या लवकर हे काम सुरू करण्याची तयारीही महापालिकेने सुरू केली आहे.

या प्रकल्पात २.४ किलोमीटर लांबीचा मार्ग विकसित करण्यात येणार असून, त्यात ९३० मीटर लांबीचा चार-लेन (दोन अधिक दोन) बोगदा आणि दोन्ही बाजूंना ॲप्रोच रस्ते असतील. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर हिंगणे ते धनकवडी हा प्रवास अवघ्या पाच ते दहा मिनिटांत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे प्रवासाचे अंतर, वेळ, इंधनाचा वापर आणि वाहतूक कोंडी कमी होईल, असा महापालिकेचा दावा आहे.

### वाकडेवाडीत बांधणार उड्डाणपूल

वाकडेवाडी परिसरातील कोंडी फोडण्यासाठी महापालिकेने साखर संकुल येथून जुना पुणे-मुंबई महामार्गाकडे जाणारा उड्डाणपूल व ग्रेड सेपरेटर प्रस्तावित केला आहे. या उड्डाणपुलामुळे गणेशखिंड रस्त्यावरून थेट साखर संकुलमार्गे पुणे-मुंबई रस्त्यावर ये-जा करता येईल. या ७३.५२ कोटी रुपयांच्या खर्चाच्या उड्डाणपुलाला मान्यता देताना महापालिकेच्या स्थायी समितीने कलम '७२ ब' अंतर्गत यासाठी पुढील वर्षांसाठीही आर्थिक दायित्व स्वीकारले आहे.

### 'नेटवर्क'मधील दुवा

प्रस्तावित बोगदा हा इंटरमिजिएट रिंग रोड (आयआरआर) नेटवर्कमधील महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. शहराच्या पश्चिम आणि दक्षिण भागांतील वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध होईल. सिंहगड रस्ता, सातारा रस्ता परिसरातील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होईल. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी पर्यावरणीय मंजुरी, भूसंपादन आणि आर्थिक तरतूद या महत्त्वाच्या प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतील. या पार्श्वभूमीवर निविदा प्रक्रिया सुरू करण्याची तयारी महापालिकेने केली असून, त्यानंतर प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांना प्रारंभ होणार आहे.

# १० कचरा प्रक्रिया केंद्रांचा मार्ग खडतर

## मोशी डेपोला पर्याय शोधताना महापालिकेपुढे नागरिकांचा विरोध आणि जागेची मोठी अडचण

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर शहरातील कचरा व्यवस्थापनासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित एकूण १० कचरा प्रक्रिया केंद्रे उभारण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, पूर्वीच्या अनुभवामुळे रहिवासी, हाऊसिंग सोसायट्या आणि स्थानिक लोकप्रतिनिधींकडून या केंद्रांना मोठा विरोध होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

मोशी येथील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पातील प्रशासकीय इमारत कोसळून नऊ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यानंतर शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर आला. डेपोची क्षमता संपल्याने आणि स्थानिक विरोधामुळे तेथे कचरा टाकण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत. सध्या निगडी येथील देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या जुन्या डेपोमध्ये तात्पुरत्या स्वरूपात कचरा टाकला जात आहे.

या पार्श्वभूमीवर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात बायो-सीएनजी आधारित कचरा प्रक्रिया केंद्र उभारण्याची घोषणा केली आहे. प्रत्येक केंद्रासाठी १० ते १५ एकर जागा निश्चित करून पुढील तीन महिन्यांत सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकल्पातून दुर्गंधी होणार नसल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

मात्र, पूर्वी कचरा प्रकल्पांमुळे आलेल्या दुर्गंधी आणि अस्वच्छतेच्या अनुभवामुळे अनेक हाऊसिंग सोसायट्या आपल्या परिसरात कचरा प्रक्रिया केंद्र उभारण्यास विरोध करत आहेत. त्यामुळे या केंद्रांच्या उभारणीसाठी प्रशासनाला नागरिकांचा आणि लोकप्रतिनिधींचा विरोध झेलत कठोर भूमिका घ्यावी लागणार आहे. कचरा व्यवस्थापनासाठी महापालिकेने नवी दिशा निश्चित केली असली, तरी नागरिकांचा विश्वास संपादन करून नियोजित १० केंद्रांची प्रत्यक्ष उभारणी करणे हे प्रशासनापुढील सर्वात मोठे आव्हान ठरणार आहे.



### एसटीपी आणि ओल्या कचऱ्यावरही उदासीनता

मोठ्या हाऊसिंग सोसायट्यांसाठी एसटीपी (सांडपाणी प्रक्रिया केंद्र) आणि ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक असतानाही अनेक सोसायट्यांकडून त्याला प्रतिसाद मिळत नाही.

एसटीपी न उभारणाऱ्या ९९ सोसायट्यांवर कारवाई सुरू असून, ओल्या कचऱ्यावरील प्रक्रिया सक्तीची करण्याचा निर्णयही लोकप्रतिनिधींच्या दबावामुळे स्थगित करण्यात आला आहे.

### पूर्वीच्या प्रकल्पांनाही विरोध

२०२३ मध्ये शहरात उभारण्यात येणाऱ्या १६ कचरा स्थानांतरण केंद्रांपैकी नागरिकांच्या विरोधामुळे केवळ चार केंद्रेच सुरू होऊ शकली. पुनावळे येथील प्रस्तावित कचरा डेपोचे आरक्षणही स्थानिक विरोधानंतर रद्द करण्यात आले होते.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ४०% महिला-तरुणी पीसीओएसच्या विळख्यात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**बदलती जीवनशैली, फास्टफूडचे वाढते सेवन, व्यायामाचा अभाव आणि ताणतणाव यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील महिला आणि तरुणींमध्ये पॉलिसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम (पीसीओएस) या आजाराचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. शहरातील सुमारे ४० टक्के महिला व तरुणी पीसीओएसने ग्रस्त असल्याचे स्त्रीरोग तज्ज्ञांनी सांगितले असून, विशेषतः १८ ते ३० वयोगटातील युवतींमध्ये या आजाराचे प्रमाण अधिक असल्याचे निरीक्षण आहे.**

पीसीओएस हा हार्मोन्सच्या असंतुलनामुळे होणारा विकार असून, त्यामुळे अंडाशयात लहान गाठी तयार होतात. परिणामी अनियमित मासिक पाळी, वजन वाढणे, ओव्ह्युलेशनमध्ये अडथळे, गर्भधारणेस विलंब, गर्भपाताचा धोका तसेच गर्भधारणेदरम्यान मधुमेहासारख्या गुंतागुंती निर्माण होऊ शकतात. दीर्घकाळ उपचार न घेतल्यास वंध्यत्व, उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि मधुमेहाचा धोका वाढतो.

तज्ज्ञांच्या मते, बैठी जीवनशैली, तेलकट व जंक फूडचे वाढते सेवन, झोपेचा अभाव, वाढलेला मानसिक ताण आणि अनुवंशिक कारणांमुळे हा विकार झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे महिलांनी नियमित व्यायाम, संतुलित व कमी कॅलरीयुक्त आहार, पुरेशी झोप आणि ताणतणाव नियंत्रणावर भर देण्याची गरज आहे.

> पूर्वीपेक्षा महिलांमध्ये पीसीओडीचे प्रमाण वाढलेले असून, ते ४० टक्क्यांवर पोहचले आहे. महिलांपेक्षा १८ ते ३० वयोगटातील मुलींमध्ये याचे प्रमाण जास्त आहे. बदलेली जीवनशैली व्यायामाचा अभाव, फास्टफूडमुळे वाढत्या वजनाच्या समस्या वाढत आहेत. त्यामुळे डायबिटीजचा धोका वाढू शकतो.
>
> **- डॉ. महेश आसलकर,**
> **प्राध्यापक व विभाग प्रमुख**
> **स्त्रीरोग व प्रसूती विभाग,**
> **वायसीएम**

वायसीएम रुग्णालयातील स्त्रीरोग विभागाचे प्रमुख डॉ. महेश आसलकर यांनी सांगितले की, पूर्वीच्या तुलनेत पीसीओएसचे प्रमाण लक्षणीय वाढले असून, विशेषतः तरुणींमध्ये हा विकार अधिक आढळत आहे. जीवनशैलीत बदल केल्यास या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवता येऊ शकते.



स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. श्रीराज कटकधोंड यांनी महिलांनी रोज किमान ४५ मिनिटे चालणे, नियमित व्यायाम, तंतुमय व प्रथिनयुक्त आहार, ६ ते ८ तासांची झोप आणि ध्यानधारणा यांचा अवलंब करण्याचा सल्ला दिला आहे. तरुणी तेजस्विनी सदाशिव यांनी अभ्यास आणि करिअरच्या ताणामुळे अनेक मुली आरोग्याकडे दुर्लक्ष करतात, असे सांगितले. माया कांबळे यांनीही कामाच्या धावपळीत स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केल्याने मासिक पाळीच्या समस्या वाढल्याचा अनुभव सांगत महिलांनी स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, पीसीओएसची लक्षणे सुरुवातीला दुर्लक्षित न करता वेळेवर तपासणी आणि उपचार घेतल्यास गंभीर गुंतागुंत टाळता येऊ शकते. त्यामुळे बदलत्या जीवनशैलीत महिलांनी आरोग्यदायी सवयी अंगीकारणे ही काळाची गरज असल्याचे तज्ज्ञांनी अधोरेखित केले आहे.

### पीसीओडी म्हणजे काय?

पीसीओडी आजार ही एक हार्मोनल समस्या आहे. संप्रेरकांच्या असंतुलानामुळे म्हणजेच हार्मोनल इमबॅलन्समुळे महिलांच्या अंडाशयात लहान-लहान आकारांच्या गाठी तयार होतात. ज्यामुळे महिलांना अनियमित मासिक पाळीचा त्रास होतो आणि गर्भधारणेमध्ये समस्या उद्‌भवतात.



## भूमिका

**महाराष्ट्राचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी अल्पावधीत केलेल्या धडक कारवाईमुळे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे की, शासनाकडे कायदे आणि अधिकाऱ्यांची कमतरता नाही; कमतरता आहे ती त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या इच्छाशक्तीची.**

# एक अधिकारी, एक महिना आणि सुशासनाची नवी आशा



अनेक वर्षे दुर्लक्षित राहिलेल्या अन्नसुरक्षा आणि औषध नियंत्रणासारख्या विषयांवर त्यांनी कठोर कारवाई करून नियमांचे पालन ऐच्छिक नसून बंधनकारक असल्याचा ठोस संदेश दिला आहे.

अस्वच्छ हॉटेलांवरील धाडी, निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांवर कारवाई, बनावट दूध, पनीर आणि औषधांच्या साठ्यांचा पर्दाफाश, तसेच दोषी आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यासारख्या निर्णयांमुळे प्रशासनाची कार्यक्षमता नागरिकांना प्रत्यक्ष अनुभवता आली. या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ किरकोळ उल्लंघनांवर कारवाई न करता संपूर्ण पुरवठा साखळीवर लक्ष केंद्रित करण्यात आले.

त्यामुळे शासन इच्छाशक्ती दाखविल्यास व्यवस्था किती वेगाने बदलू शकते, याचे उदाहरण समोर आले. यातून एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. जर एका अधिकाऱ्याने काही आठवड्यांत एवढा बदल घडवून आणला, तर इतर विभागांमध्ये अशीच तत्परता का दिसत नाही? पोलिस विभागाने तक्रारींची तत्काळ नोंद, भ्रष्टाचारमुक्त सेवा आणि नागरिकाभिमुख कामकाज सुनिश्चित केले, आरोग्य विभागाने रुग्णालयांतील अनियमिततेवर कठोर कारवाई केली किंवा शिक्षण विभागाने दर्जेदार शिक्षण व पारदर्शक शुल्कव्यवस्था राबवली, तर नागरिकांचा शासनावरील विश्वास निश्चितच अधिक दृढ होईल.

यासाठी नवीन कायदे किंवा मोठ्या निधीची गरज नसून विद्यमान नियमांची प्रामाणिक अंमलबजावणी आवश्यक आहे.भारतीय प्रशासकीय इतिहासात याची अनेक उदाहरणे आहेत. माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी.एन.शेषन यांनी कोणतेही नवीन कायदे न करता विद्यमान अधिकारांचा प्रभावी वापर करून निवडणूक प्रक्रियेला शिस्त लावली. त्यांच्या कार्यकाळानंतर निवडणूक आयोगाबद्दलचा जनविश्वास वाढला. हेच तुकाराम मुंढे यांच्या कामातूनही दिसून येते.नागरिक स्वभावतः निराश नसतात; निष्क्रिय आणि निर्णयशून्य व्यवस्था त्यांना निराश बनवते. मात्र एखादा अधिकारी धाडसी, पारदर्शक आणि न्याय्य कृती करताना दिसला की जनतेचा विश्वास पुन्हा निर्माण होतो.

त्यामुळे शासनव्यवस्थेत व्यक्तीपेक्षा कार्यपद्धती महत्त्वाची असली, तरी अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांमुळे संपूर्ण यंत्रणेला दिशा मिळते.तुकाराम मुंढे यांच्या कारवाईचे खरे महत्त्व केवळ धाडी किंवा जप्त्यांपुरते मर्यादित नाही. त्यांनी प्रत्येक प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधीसमोर एक मूलभूत प्रश्न उभा केला आहे— विद्यमान अधिकारांचा प्रभावी वापर करून नागरिकांना सुशासनाचा अनुभव देता येत असेल, तर उर्वरित व्यवस्था अजूनही कोणत्या गोष्टीची वाट पाहत आहे? सुशासनाचा पाया नवीन नियमांत नसून प्रामाणिक अंमलबजावणीत आहे, हेच या अनुभवाने अधोरेखित केले आहे.

## प्रासंगिक »

### बदलण्याची संधी

**सरधोगा जिल्ह्यातील दिवाण मदनगोपाल हे अतिशय श्रीमंत होते, पण त्यांना दारूचे व्यसन होते. त्यांच्या घरी विलायती दारूच्या अनेक पेट्या साठवलेल्या होत्या.**

एके दिवशी एक तेजस्वी साधू त्यांच्या घरी आले आणि म्हणाले, "मला एकच वचन द्या—आजपासून दारू कायमची सोडा." वचन पाळण्याचा निर्धार करून मदनगोपाल यांनी नोकरांना सर्व दारूच्या बाटल्या फोडण्याचा आदेश दिला. साधू निघून गेल्यानंतर एका नोकराने रात्रीसाठी लपवून ठेवलेली एक बाटली आणून दिली. क्षणभर मोह झाला, पण दिलेल्या वचनाची आठवण होताच मदनगोपाल यांनी ती बाटलीही स्वतःच्या हाताने फोडली.

त्या दिवसापासून त्यांनी आयुष्यात पुन्हा कधीही दारूला स्पर्श केला नाही. पुढे त्यांनी वृंदावन येथे जाऊन दीक्षा घेतली आणि श्रीकृष्णभक्तीत जीवन अर्पण केले. त्यांनी "निमाई-चंद" हा उत्कृष्ट उर्दू ग्रंथी लिहिला. एका योग्य निर्णयाने आणि दृढ इच्छाशक्तीने त्यांच्या आयुष्याला नवे वळण मिळाले.

- तात्पर्य : स्वतःला बदलण्याची संधी मिळाल्यावर तिचा स्वीकार केला, तर तीच संधी आयुष्याला यश, समाधान आणि योग्य दिशा देऊ शकते.

महाराष्ट्राच्या राजकारणात पक्षांतराच्या चर्चांना नवे वळण मिळाले की काही नेते पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी येतात. शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्याबाबत सध्या सुरू असलेल्या चर्चाही त्याचाच भाग आहेत.

# जयंतरावांच्या निर्णयाची प्रतीक्षा



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या त्यांच्या भेटीनंतर ते भाजपमध्ये जाणार की अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार, अशा विविध राजकीय तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. जयंत पाटील हे शरद पवार यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून त्यांनी पक्षासाठी सातत्याने काम केले असून अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.

त्यामुळे ते पक्ष सोडतील, अशी शक्यता त्यांच्या समर्थकांना सहज मान्य होत नाही. मात्र सध्याच्या बदलत्या राजकीय परिस्थितीत अफवा आणि चर्चांना अधिक खतपाणी मिळत आहे. दरम्यान, अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतील अंतर्गत समीकरणे, प्रदेशाध्यक्षपदाबाबत सुरू असलेल्या चर्चांमुळेही जयंत पाटील यांच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

त्यातच त्यांच्या मतदारसंघातील राजकीय घडामोडी, स्थानिक स्वराज्य संस्थांतील निर्णय आणि पक्षातील आमदारांच्या अस्वस्थतेमुळे या चर्चांना अधिक बळ मिळाले आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेससमोर संघटन टिकविण्याचे मोठे आव्हान आहे. अनेक नेत्यांचे पक्षांतर, विकासकामांसाठी निधीची अडचण आणि आगामी निवडणुकांचे गणित यामुळे पक्षातील अनेक नेते वेगवेगळे पर्याय तपासत असल्याची चर्चा आहे. अशा वातावरणात प्रत्येक भेट आणि प्रत्येक हालचालीचा वेगळा राजकीय अर्थ लावला जात आहे.

मात्र, केवळ चर्चांवरून कोणाच्याही राजकीय भविष्याचा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. भारतीय राजकारणात अनेकदा राजकीय संवाद हा प्रशासनिक किंवा मतदारसंघाशी संबंधित विषयांसाठीही होत असतो. त्यामुळे कोणतीही अधिकृत घोषणा होईपर्यंत अशा चर्चांकडे सावधपणे पाहण्याची गरज आहे. आजच्या घडीला सर्वात महत्त्वाचा प्रश्न हा जयंत पाटील कोणत्या पक्षात जातील हा नसून, शरद पवार गटाचे भवितव्य काय असेल, हा आहे.

पक्षातील प्रमुख नेते एकत्र राहून संघटना मजबूत करतात की बदलत्या राजकीय समीकरणांनुसार नवे निर्णय घेतात, यावर आगामी राजकारणाची दिशा ठरणार आहे. तोपर्यंत जयंत पाटील यांच्या प्रत्येक भेटीवर आणि प्रत्येक विधानावर राजकीय चर्चा रंगत राहणार, हे मात्र निश्चित.

## ।। अभंगवाणी ।।



अवगुणांचे हातीं ।
आहे अवघी फजीती ॥१॥

नाहीं पात्रासवें चाड ।
प्रमाण तें फिकें गोड ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# लाडक्या बहिणींसाठी लवकरच नवीन योजना

## सरकारकडे पैशांची कमतरता नाही..; भाजपा नेत्याचा दावा

**महाईन्यूज । जळगाव**

**अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांतील महिलांना दिवाळीनिमित्त मोफत साडी देण्यासाठी राबवण्यात येणारी 'कॅप्टिव्ह मार्केट योजना' बंद करण्यात आली असली, तरी या निर्णयामागे आर्थिक चणचण नसल्याचे भाजप नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांनी स्पष्ट केले आहे. सरकार साडी वाटप योजना बंद केल्यानंतर त्या जागी नवीन योजना आणण्याच्या तयारीत असल्याचाही दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या नव्या योजनेकडे राज्यातील लाखो लाभार्थी महिलांचे लक्ष लागले असून नेमकी कोणती नवीन योजना आता जाहीर होते, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.**



जळगाव येथे पत्रकारांशी बोलताना गिरीश महाजन म्हणाले, की "सरकारकडे साडी वाटपासाठी पैसे नाहीत, असे मुळीच नाही. मात्र, या योजनेतून महिलांचे अपेक्षित समाधान होत नसल्याचे राज्य सरकारच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे महिलांना केवळ एक साडी देण्याऐवजी त्यांच्या कायमस्वरूपी हिताचा विचार करून अधिक उपयुक्त योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महिलांना अशी सुविधा किंवा वस्तू उपलब्ध करून द्यायची आहे, ज्यामुळे त्यांना भविष्यात फायदा होईल. त्यांना रोजगार, स्वयंरोजगार किंवा आर्थिक सक्षमीकरणाच्या संधी मिळतील, यासाठी सरकार विविध पर्यायांवर विचार करत आहे. त्यासाठी थोडा अधिक आर्थिक भार पडला तरी सरकार मागे हटणार नाही. सरकारकडे पैशांची कमतरता नाही.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात राज्याचे एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत जून २०२३ मध्ये 'कॅप्टिव्ह मार्केट योजना' जाहीर करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत राज्यातील सुमारे २५ लाख अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना दरवर्षी दिवाळीपूर्वी यंत्रमागावर विणलेली एक साडी भेट म्हणून दिली जात होती. आणि या योजनेसाठी दरवर्षी सुमारे १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार, २०२३ तसेच २०२४ आणि २०२५ या सलग तीन वर्षांत लाभार्थींना साड्यांचे वितरण करण्यात आल्याचे सांगितले जाते. राज्यातील यंत्रमाग उद्योगाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील महिलांना दिवाळीच्या सणानिमित्त वस्त्र भेट देणे, असा साडी वाटप योजनेचा उद्देश होता.

### यंदा साड्यांचे वितरण होणार नाही

मात्र, यंदा साडी वाटप योजना बंद करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने दिवाळीपूर्वी साड्यांचे वितरण होणार नसल्याचे वस्त्रोद्योग विभागातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे राज्यातील लाखो लाभार्थी महिलांना यंदा या योजनेचा लाभ मिळणार नाही. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतून ९२ लाखांहून अधिक महिलांची नावे वगळण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर साडी वाटप योजना बंद करण्याचा निर्णय समोर आल्याने विरोधकांनी सरकारवर आर्थिक अडचणींचा आरोप करत जोरदार टीका केली आहे. सरकार महिलांसाठीच्या कल्याणकारी योजनांमध्ये कपात करत असल्याचा आरोपही विरोधकांकडून करण्यात येत आहे. मात्र, या सर्व आरोपांचे खंडन करत गिरीश महाजन यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. महिलांच्या हातात केवळ एकवेळचा लाभ न देता त्यांच्या उत्पन्नात वाढ करणारी, स्वावलंबनाला चालना देणारी आणि दीर्घकालीन आर्थिक बळ देणारी योजना लवकरच जाहीर केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

# मुंबईत पोर्श कारचा अपघात; भरधाव गाडी दुभाजकला धडकली

**महाईन्यूज । मुंबई**

**कोस्टल रोडवर काही दिवसांपूर्वी एका गाडीला अचानक आग लागली, त्यामुळे मोठी वाहतूक कोंडी होऊन वाहनचालकांमध्ये घबराट पसरली होती. आता एक आठवडा उलटत नाही तोवर कोस्टल रोडवर दुसरा अपघात झाला आहे. चालकाचं नियंत्रण सुटल्याने एका भरधाव पोर्श कारची दुभाजकाला जोरदार धडक बसून अलिशान कारचं मोठं नुकसान झालं आहे. परिणामी या व्यस्त मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती.**



प्राथमिक माहितीनुसार, हा अपघात इतका भीषण होता की त्यात पोर्श कारचा पुढचा भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. मात्र, कारचे एअरबॅग्ज वेळेत उघडल्यामुळे चालकाला गंभीर दुखापत झाली नाही. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत रस्त्यावरून अपघातग्रस्त वाहन बाजूला करण्याचं काम सुरू केलं. त्यामुळे कोस्टल रोडवरील वाहतूक काही काळ प्रभावीत झाली होती, मात्र नंतर ती हळूहळू पूर्वपदावर आली.

कार चालक कोण होता आणि अपघाताचं नेमके कारण काय, याबाबत पोलिसांकडून अद्याप अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

मुंबई कोस्टल रोडवर अवघ्या काही दिवसांतच दुसरी मोठी घटना घडल्याने या महत्त्वाच्या मार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. याआधी बुधवारी दुपारी मरीन ड्राईव्ह ते वरळीला जोडणाऱ्या उत्तर वाहिनी बोगद्यात एका कारला अचानक आग लागली होती. यामुळे वाहनचालकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आणि प्रशासनाला तात्पुरत्या स्वरूपात हा बोगदा बंद करावा लागला होता. दुपारी साडेबाराच्या सुमारास लागलेल्या या आगीनंतर मुंबई अग्निशामक दल, पोलीस आणि रुग्णवाहिका यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. आगीवर अल्पावधीतच नियंत्रण मिळवण्यात आलं आणि यात कोणीही जखमी झालं नाही. मात्र, बोगदा बंद केल्यामुळे ब्रीच कँडी आणि आसपासच्या परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती.

बोगद्यात धूर आणि आगीच्या ज्वाळा पसरू लागल्याने अनेक वाहनचालकांनी आपली वाहने तिथेच सोडली आणि आपत्कालीन परिस्थिती बाहेर पडण्याच्या मार्गाकडे धाव घेतली, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. या घटनेनंतर बोगद्यातील सुरक्षा, आपत्कालीन दरवाजे आणि बाहेर पडण्याच्या कार्यपद्धतीबाबत जनजागृती करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. मुंबई कोस्टल रोडचे हे जुळे बोगदे प्रत्येकी २.०७ किमी लांबीचे असून, त्यातील सुमारे १ किमीचा भाग अरबी समुद्राखालून जातो. हे भारतातील पहिले समुद्राखालचे रस्ते बोगदे आहेत.

# मुख्यमंत्री विजय ॲक्शन मोडवर

## भ्रष्टाचार प्रकरणात ७ अधिकाऱ्यांवर मोठी कारवाई

**महाईन्यूज । तमिळनाडू**

**तमिळनाडूच्या विधानसभा निवडणुकीत आपला करीश्मा दाखवत जोसेफ विजय यांनी मोठा विजय मिळवला. त्यानंतर १० मे २०२६ रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून जोसेफ विजय यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे. मुख्यमंत्री विजय यांनी अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. त्यामुळे त्यांच्या कामाची देशभरात चर्चा होत आहे.**



तमिळनाडूच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून विजय यांनी भ्रष्टाचारविरोधी मोहिम हाती घेतलेली आहे. तसेच मुख्यमंत्री विजय यांनी आपल्या सरकारमधील मंत्र्यांना आणि अधिकाऱ्यांना देखील भ्रष्टाचाराबाबत अतिशय कडक इशारा दिलेला आहे. भ्रष्टाचाराच्या बाबतीत सरकार 'झिरो टॉलरन्स' धोरण अवलंबणार असल्याची भूमिका मुख्यमंत्री विजय यांनी घेतली आहे. पण असं असतानाही काही ठिकाणी भ्रष्टाचाराच्या घटना समोर आल्यामुळे आता मुख्यमंत्री विजय हे ॲक्शन मोडवर आले आहेत.

तमिळनाडूमध्ये भ्रष्टाचारविरोधी मोहीम अतिशय वेगाने सुरू असतानाच 'ग्रेटर चेन्नई कॉर्पोरेशन'च्या (GCC) ७ अधिकाऱ्यांवर कथित भ्रष्टाचार आणि संशयास्पद आर्थिक व्यवहारांच्या आरोपाप्रकरणी मोठी कारवाई करण्यात आली आहे. या सातही अधिकाऱ्यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आलं आहे. एवढंच नाही तर या प्रकरणात सातही अधिकाऱ्यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. या संदर्भातील वृत्त न्यूज १८ ने दिलं आहे.

दरम्यान, मागच्या आठवड्यात चेन्नईमधील ग्रेटर चेन्नई कॉर्पोरेशनच्या दोन विभागात अचानक तपासणी करण्यात आली होती. या तपासणीत अधिकाऱ्यांना हिशेब नसलेली काही रोख रक्कम आणि संशयास्पद डिजिटल व्यवहार आढळून आले होते. ही तपासणी झोन ६ आणि झोन ९ मध्ये करण्यात आली होती. या कारवाई दरम्यान एका सहाय्यक कार्यकारी अभियंत्याला २.३९ लाख रुपयांच्या जी-पे व्यवहारांबाबत व्यवस्थित स्पष्टीकरण देता आलं नाही.

तसेच तमिळनाडूच्या दक्षता आणि भ्रष्टाचार विरोधी संचालनालयाकडून ग्रेटर चेन्नई कॉर्पोरेशनला अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचार विरोधी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच त्यांची विभागीय चौकशी देखील सुरू आहे.

दरम्यान, सरकारी कार्यालयांमधील लाचखोरी आणि भ्रष्टाचाराच्या कथित घटनांच्या तक्रारी नागरिकांना करता याव्यात, यासाठी तामिळनाडू सरकारने एक विशेष व्हॉट्सॲप हेल्पलाइन सुरू केली आहे. या प्लॅटफॉर्मद्वारे तक्रारदार तपासणीसाठी आवश्यक पुरावे आणि तपशील थेट दक्षता विभागाच्या अधिकाऱ्यांकडे पाठवून तक्रार करू शकतात.

# बिन्यामिन नेतान्याहूंना न्यूयॉर्कमध्ये होऊ शकते अटक?

**महाईन्यूज । इराण**

**अमेरिका-इराण संघर्ष दिवसेंदिवस वाढत चालला आहे. या युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये तणाव निर्माण होत असल्याने जागतिक व्यापाराला फटका बसत आहे. त्यामुळे याचे गंभीर परिणाम इतर देशांवर होत आहेत. या घडामोडी सुरू असतानाच दुसरीकडे इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांना न्यूयॉर्कमध्ये अटक होऊ शकते अशा चर्चा सुरू झाल्या आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.**



बिन्यामिन नेतान्याहू यांना न्यूयॉर्कमध्ये अटक होऊ शकते असे संकेत न्यूयॉर्क शहराचे महापौर झोहरान ममदानी यांनी दिले आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या ८१ व्या अधिवेशनासाठी बिन्यामिन नेतान्याहू हे सप्टेंबरमध्ये न्यूयॉर्क शहराला भेट देण्याची शक्यता आहे. त्यामुळे बिन्यामिन नेतान्याहू हे न्यूयॉर्कमध्ये आले तर त्यांना अटक करायची की नाही? यावर आपलं प्रशासन विचार करत असल्याचं भाष्य झोहरान ममदानी यांनी न्यूयॉर्क टाइम्सच्या एका पॉडकास्टमध्ये बोलताना केलं आहे.

झोहरान ममदानी यांच्या या वक्तव्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. दुसऱ्या देशाच्या पंतप्रधानांना परदेशात अटक केली जाऊ शकते का? असाही सवाल उपस्थित केला जात आहे. झोहरान ममदानी यांनी याआधीही म्हणजे न्यूयॉर्क शहराच्या महापौराच्या निवडणुकीदरम्यान एका मुलाखतीत बोलताना अशाच पद्धतीचं वक्तव्य केलं होतं. आता पुन्हा एकदा बिन्यामिन नेतान्याहू यांच्या अटकेसंदर्भात ममदानी यांनी वक्तव्य केल्याने नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

### झोहरान ममदानी यांनी काय म्हटलं?

'न्यूयॉर्क टाइम्स'च्या एका पॉडकास्टमध्ये ममदानी यांनी म्हटलं की, पंतप्रधान नेतान्याहू यांनी 'द हेग'मध्ये (आंतरराष्ट्रीय न्यायालयात) असायला हवं असं मला वाटतं. कारण आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालयाने (ICC) त्यांच्याविरुद्ध कथित युद्धांच्या संदर्भातील गुन्ह्यांसाठी अटकेचं वॉरंट जारी केलेलं आहे. तसेच गाझामधील युद्धादरम्यान घडलेल्या घटनांसाठी जबाबदारी निश्चित केली जावी, असं जगभरातील अनेक लोकांचं देखील मत आहे", असं झोहरान ममदानी यांनी म्हटलं आहे. "मी हे देखील सांगू इच्छितो की, न्यूयॉर्क शहरातील कायद्यांचं पालन मी करेन. कारण शहराचं नेतृत्व करणारी व्यक्ती म्हणून कायद्याचं पालन करण्यासाठी आपलं प्राधान्य राहील. न्यूयॉर्क शहरातील कायद्यानुसार प्रशासन जे काही शक्य असेल ते सर्व करेल", असं सूचक भाष्य झोहरान ममदानी यांनी केलं आहे.

# प्रियांकाचा वाराणसीमधील फर्स्ट लुक व्हायरल



बॉलिवूड ते हॉलीवूड असा यशस्वी प्रवास करणारी अभिनेत्री प्रियांका चोप्रा पुन्हा एकदा भारतीय चित्रपटसृष्टीत मोठ्या भूमिकेसह पुनरागमन करत आहे. दिग्दर्शक एस. एस. राजामौली यांच्या बहुचर्चित 'वाराणसी' या चित्रपटातून ती प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटातील तिचा 'मंदाकिनी' या व्यक्तिरेखेचा पहिला लुक नुकताच सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आला असून, तो सध्या चांगलाच व्हायरल होत आहे. प्रियांकाच्या वाढदिवसानिमित्त राजामौली यांनी हे खास फोटो शेअर करत तिच्या व्यक्तिरेखेची झलक चाहत्यांसमोर आणली.

राजामौली यांनी सोशल मीडियावर दोन वेगवेगळे फोटो पोस्ट केले आहेत. पहिल्या फोटोमध्ये प्रियांकाने काळ्या रंगाचा पोशाख परिधान केला आहे. तिची हेअरस्टाईल, चेहऱ्यावरील गंभीर भाव आणि आत्मविश्वासपूर्ण देहबोली लक्ष वेधून घेते. तिचा हा लुक चित्रपटातील एका खास गाण्यातील असल्याचे सांगितले जात आहे. दुसऱ्या फोटोमध्ये ती पांढरा शर्ट आणि काळी पँट घालून उडी मारताना दिसते. तिच्या मागे झेब्रा, जिराफ यांसारखे प्राणी दिसत असल्याने हा सीनही प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण करणारा ठरला आहे.

हे फोटो शेअर करताना एस. एस. राजामौली यांनी एक खास कॅप्शन लिहिले. त्यांनी म्हटले, "ती हसते तेव्हा खूप सुंदर दिसते... आणि ती हसत नाही तेव्हा तिच्या नजरेत आग असते." त्यांच्या या एका वाक्यामुळे प्रियांकाच्या 'मंदाकिनी' या व्यक्तिरेखेबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. चित्रपटातील 'मंदाकिनी' ही व्यक्तिरेखा धाडसी, आत्मविश्वासू, भावनिक आणि जगभर प्रवास करणारी महिला म्हणून दाखवण्यात आली आहे. ती संकटांना न घाबरणारी आणि आपल्या ध्येयासाठी लढणारी व्यक्ती आहे. त्यामुळे प्रियांकाच्या कारकिर्दीतील ही आणखी एक दमदार भूमिका ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# कल्की झालेली अस्वस्थ!



बॉलिवूड अभिनेत्री कल्की कोचलिन हिने नुकताच चित्रपटसृष्टीतील एक धक्कादायक अनुभव चाहत्यांसमोर मांडला आहे. एका चित्रपट निर्मात्याने तिच्या चेहऱ्यावरील 'लाफ लाइन्स' (हसल्यावर दिसणाऱ्या नैसर्गिक रेषा) कमी करण्यासाठी कॉस्मेटिक फिलर्स करून घेण्याचा सल्ला दिला होता. ही घटना एका साध्या लंच मीटिंगदरम्यान घडली होती. निर्मात्याच्या या अनपेक्षित आणि वैयक्तिक टिप्पणीमुळे ती अस्वस्थ झाली होती. मात्र, वाद घालण्याऐवजी तिने शांतपणे आणि विनोदाने ती परिस्थिती हाताळल्याचे कल्कीने सांगितले. एका मुलाखतीत कल्कीने हा अनुभव सविस्तर सांगितला. ती म्हणाली की, एका निर्मात्यासोबत तिची लंच मीटिंग सुरू होती. त्या वेळी तो निर्माता त्याच्या माजी जोडीदाराविषयी बोलत होता. तीदेखील एक प्रसिद्ध अभिनेत्री आहे. संभाषणादरम्यान त्याने सांगितले की, तिने खूप जास्त बोटॉक्स करून घेतल्यामुळे तिचा चेहरा नैसर्गिक राहिला नाही आणि त्याचा परिणाम चांगला झाला नाही. या चर्चेनंतर त्या निर्मात्याने अचानक कल्कीकडे पाहत तिच्या चेहऱ्याबाबत टिप्पणी केली. त्याने तिला, "तू तुझ्या लाफ लाइन्ससाठी फिलर्स करून घ्यायला हवेत," असा सल्ला दिला. ही टिप्पणी ऐकून कल्कीला धक्का बसला. तिला रागही आला, पण त्या क्षणी तिने कोणताही वाद न घालता हसून विषय टाळला.




# 7 ऑगस्टला झळकणार 'ऑपरेशन सफेद सागर'

नेटफ्लिक्सची आगामी वेबसीरिज 'ऑपरेशन सफेद सागर' 7 ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे. ओनी सेनकडून दिग्दर्शित या सीरिजमध्ऽय सिद्धार्थ, जिमी शेरगिल, अभय वर्मा, दीया मिर्झा, प्राजक्ता कोळी, आदिल हुसैन, मिहिर आहूजा, तारुक रैना, अर्नव भसीन अन् अमृता बागची मुख्य भूमिकेत आहे.

या सीरिजचा टीझर जारी करण्यात आला आहे. 1999 च्या कारगिल युद्धाच्या पार्श्वभूमीवर आधारित ही सीरिज वायुदलाच्या गोल्डन एरो स्क्वाड्रनची कहाणी सांगणारी आहे. अधिक उंचीवरील हवाई अभियान पार पाडणाऱ्या या स्क्वाड्रनने युद्धादरम्यान पाकिस्तानी सैन्याला पराभूत करण्यास भारतीय सैन्याला मोठी मदत केली होती. टीझरमध्ये मिहिर आहूजा, अभय वर्मा आणि तारुक रैना यांना युवा वैमानिकाच्या रुपात सादर करण्यात आले आहे. तर त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन केले जाते, ज्यांची भूमिका सिद्धार्थ आणि जिमी शेरगिल यांनी साकारली आहे. ही सीरिज भारतीय वायुदलाच्या 1999 मधील मिशन ऑपरेशन सफेद सागरवर आधारित आहे. याची निर्मिती मॅचबॉक्स शॉट्स आणि फील गुड फिल्म्सकडून करण्यात आली आहे.

# सिंधूची जपान ओपनमध्ये 'सुवर्ण' भरारी

## दोन वर्षांचा जेतेपदाचा दुष्काळ संपवला; अशी कामगिरी करणारी ठरली पहिलीच भारतीय!

**महाईन्यूज । जपान**

**दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू आज (दि.१९ जुलै) नवा इतिहास रचला. अटीतटीच्या सामन्यात सिंधूने जपानच्या अयाने यामागुचीचा सरळ गेम्समध्ये पराभव करत जपान ओपन सुपर ७५० (Japan Open) जेतेपदावर आपले नाव कोरले. हे तिचे पहिलेच सुपर ७५० जेतेपद आहे. यासह जपान ओपन जिंकणारी ती पहिली भारतीय खेळाडू ठरली असून, तिने गेल्या दोन वर्षांहून अधिक काळापासून असलेला जेतेपदाचा दुष्काळही संपवला आहे.**




तीन वेळच्या विश्वविजेत्या यामागुचीचा २१-१७, २१-१७ असा पराभव करत सिंधूने हा ऐतिहासिक विजय मिळवला. २०१९ मधील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेनंतरचे हे तिचे सर्वात मोठे यश आहे. यापूर्वी तिने २०२४ मध्ये सय्यद मोदी इंटरनॅशनल स्पर्धेत जेतेपद पटकावले होते.

दमदार स्मॅशेस आणि अचूक नेट प्लेचा वापर करत तिने यामागुचीला सामन्यात पुनरागमन करण्याची एकही संधी दिली नाही. पहिल्या गेममध्ये सिंधूने ३-० अशी दमदार सुरुवात केली होती, पण काही अनपेक्षित चुका आणि यामागुचीच्या आक्रमक उत्तरांमुळे धावसंख्या ३-३ अशी बरोबरीत आली. सुरुवातीला दोन्ही खेळाडूंकडून चुका झाल्या, पण यामागुचीच्या सर्व्हिसच्या चुकीमुळे धावसंख्या ५-५ अशी झाली. येथून सिंधूने सामन्यावर पकड मजबूत करण्यास सुरुवात केली. अत्यंत संयमाने रॅलीज खेळत तिने ८-६ अशी आघाडी घेतली.एका जबरदस्त स्मॅशसह तिने ही आघाडी ९-६ वर नेली, परंतु लागोपाठ झालेल्या चुकांमुळे यामागुचीला पुनरागमन करण्याची संधी मिळाली. जपानी खेळाडूने 'बॉडी स्मॅश' मारत स्कोअर ९-९ केला आणि मध्यांतरापर्यंत सिंधू दोन गुणांनी मागे पडली.

मध्यांतरानंतर भारतीय स्टारने जोरदार पुनरागमन केले. तब्बल ३६ शॉट्सची एक आव्हानात्मक रॅली जिंकत तिने धावसंख्या ११-११ अशी बरोबरीत आणली. त्यानंतर एका क्रॉस-कोर्ट स्मॅशच्या जोरावर तिने १३-१२ अशी आघाडी घेतली. नेटवरील उत्कृष्ट खेळ आणि प्रतिस्पर्ध्याला चुका करण्यास भाग पाडत सिंधूने १६-१२ अशी मजबूत आघाडी घेतली.

यामागुचीनेही हार न मानता चिवट खेळ केला आणि धावसंख्या १७-१५ वर आणली. यादरम्यान दोन्ही खेळाडूंमध्ये ३८ शॉट्सची थरारक रॅली पाहायला मिळाली, ज्यानंतर स्कोअर १७-१७ असा बरोबरीत आला. मात्र, निर्णायक क्षणी सिंधूने आपला खेळ उंचावला. एका अचूक क्रॉस-कोर्ट स्मॅशमुळे तिने १९-१७ अशी आघाडी घेतली आणि अखेर पहिला गेम २१-१७ असा नावावर केला. पहिल्या गेममधील हाच आत्मविश्वास सिंधूने दुसऱ्या गेममध्येही कायम ठेवला. तिने कोर्टच्या पुढील भागावर नियंत्रण मिळवत यामागुचीवर दबाव वाढवला. सामन्यातील सर्वाधिक अशा ४४ शॉट्सच्या रॅलीचा शेवट यामागुचीच्या शॉट बाहेर जाण्याने झाला आणि सिंधूने सलग सहा गुण घेत ८-३ अशी मोठी आघाडी घेतली.

### चार वर्षांत प्रथम यामागुची पराभूत

यामागुची ही सहाव्यांदा जपान ओपनच्या अंतिम फेरीत खेळत होती आणि अलीकडच्या काळात तिचे पारडे जड होते. गेल्या चार वर्षांत सिंधूला एकाही पूर्ण झालेल्या सामन्यात यामागुचीला पराभूत करता आले नव्हते. २०२२ च्या थायलंड ओपनमध्ये सिंधूने तिला शेवटचे पूर्ण सामन्यात हरवले होते. या वर्षाच्या सुरुवातीला मलेशिया ओपनमधील त्यांची लढत यामागुचीने पहिल्या गेमनंतर दुखापतीमुळे माघार घेतल्याने लवकर संपली होती. आज झालेल्या सामन्यात सिंधू पूर्णपणे फॉर्मात दिसली. तिने सुरुवातीपासूनच सामन्याचा वेग स्वतःच्या नियंत्रणात ठेवला.

# एम्बापेचा विश्वविक्रम; पण बुकायोमुळे इंग्लंडने मारली बाजी

**महाईन्यूज । न्यूयॉर्क**

**जगभरातील फुटबॉल चाहत्यांचे लक्ष वेधलेल्या फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या सामन्यात एका ऐतिहासिक आणि हाय-स्कोरिंग सामन्याची नोंद झाली. शनिवारी रात्री मियामी येथील 'हार्ड रॉक स्टेडियम'वर झालेल्या थरारक सामन्यात इंग्लंडने फ्रान्सवर ६-४ असा दणदणीत विजय मिळवत कांस्यपदक पटकावले.**






### एम्बापेचा ऐतिहासिक 'महा-विक्रम'

सामन्याच्या ४८ व्या मिनिटाला एमबापेने इंग्लंडचा गोलकीपर डीन हेंडरसनला चकवत फ्रान्ससाठी पहिला गोल केला. यानंतर २७ वर्षीय एमबापेने सामन्याच्या ६६ व्या मिनिटाला फुटबॉल जगतात इतिहास रचला. बॉक्सच्या आत मिळालेल्या बॉलवर डाव्या पायाने १४ यार्डांवरून एक जोरदार शॉट मारत त्याने चेंडू गोलपोस्टमध्ये धाडला. या गोलसह चालू स्पर्धेत त्याचे एकूण १० गोल झाले आणि गोल्डन बूटच्या शर्यतीत त्याने लिओनेल मेस्सीला (८ गोल) मागे टाकले.

फ्रान्सचा कर्णधार किलियन एम्बापे(Kylian Mbappé) विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक २२ गोल करण्याचा विश्वविक्रम रचला, मात्र बुकायो साकाची धडाकेबाज हॅट्रिक आणि ज्युड बेलिंगहॅमच्या झुंझार खेळापुढे एमबापेचा हा ऐतिहासिक पराक्रम फिका पडला.

सामन्याच्या सुरुवातीला इंग्लंडचे स्टार खेळाडू हॅरी केन आणि ज्युड बेलिंगहॅम बेंचवर (राखीव खेळाडू म्हणून) बसलेले असतानाही, इंग्लंडच्या संघाने आक्रमक खेळ केला. त्यांनी फ्रान्सच्या बचावफळीला खिंडार पाडत सुरुवातीलाच ४-० अशी भक्कम आणि एकतर्फी आघाडी घेतली होती. स्पेनविरुद्धच्या उपांत्य फेरीतील पराभवातून फ्रान्सचा संघ अजून सावरलेला दिसत नव्हता. फ्रान्सचा पराभव निश्चित मानला जात असतानाच, कर्णधार एमबापेने एकहाती झुंज देत संघाचे पुनरागमन करून दिले.

हा गोल एमबापेच्या जागतिक कारकिर्दीतील २२ वा विश्वचषक गोल ठरला. यासह त्याने लिओनेल मेस्सीचा विश्वचषकातील सर्वाधिक २१ गोल्सचा जुना विक्रम अधिकृतपणे मोडीत काढला आणि तो विश्वचषक इतिहासातील 'ऑल-टाइम टॉप स्कोअरर' बनला आहे.

एमबापेच्या दुसऱ्या गोलमुळे फ्रान्सने सामन्यात ४-३ अशी जोरदार मुसंडी मारली होती. मात्र, इंग्लंडने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले. इंग्लंडच्या बुकायो साकाने मैदानावर अप्रतिम खेळ करत आपली शानदार हॅट्रिक पूर्ण केली आणि दुसऱ्या हाफमधील कमालीच्या गोंधळातही इंग्लंडला आघाडीवर ठेवले.

सामना संपायला काही वेळ शिल्लक असताना फ्रान्सच्या उस्माने डेम्बेलेने गोल करून स्कोअर ५-४ असा केला आणि सामना बरोबरीत आणण्याच्या आशा जिवंत ठेवल्या. परंतु, सामन्याच्या शेवटच्या मिनिटांत राखीव खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या ज्युड बेलिंगहॅमने फ्रान्सच्या आशेवर पाणी फेरले.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। सोमवार ।
दि. 20 जून 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पिंपरी-चिंचवडमध्ये मतदार पडताळणीला वेग

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

पिंपरी-चिंचवड शहरात सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) अभियानाला वेग आला असून, मतदार यादीतील माहिती अचूक व अद्ययावत करण्यासाठी महापालिका प्रशासनाने तयारी वाढविली आहे. या अभियानाचा आढावा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतला असून, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना घरोघरी जाऊन माहितीची पडताळणी आणि अर्ज संकलन जबाबदारीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

या बैठकीला उपायुक्त सचिन पवार, मतदार नोंदणी अधिकारी संदीप खोत, अर्चना यादव आणि सचिन पाटील उपस्थित होते. उपायुक्त पवार यांनी बीएलओंकडून सुरू असलेल्या घरोघरी भेटी, अर्ज संकलन, प्रलंबित प्रकरणे आणि मतदार नोंदणीच्या प्रगतीचा आढावा सादर केला. निर्धारित कालावधीत सर्व कामे पूर्ण करण्यासाठी विभागनिहाय नियोजन करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत अचूकपणे समाविष्ट होणे ही लोकशाहीसाठी अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचे सांगत, नागरिकांनी बीएलओंना आवश्यक कागदपत्रे आणि माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले. मतदार यादीतील नाव, पत्ता, छायाचित्र किंवा इतर तपशीलात दुरुस्ती आवश्यक असल्यास संबंधित मदत कक्षाशी संपर्क साधून प्रक्रिया पूर्ण करण्याचेही त्यांनी सांगितले.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी सांगितले की, २९ जुलैपूर्वी फॉर्म न भरल्यास संबंधित मतदाराचे नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होणार नाही. त्यामुळे सर्व पात्र मतदारांनी मुदतीपूर्वी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### २९ जुलैपूर्वी फॉर्म भरणे आवश्यक

शहरातील मतदार पडताळणी मोहीम ३० जूनपासून सुरू आहे. नागरिकांनी आपल्या मतदान केंद्राच्या बीएलओकडे ईएफ फॉर्म भरून द्यावा किंवा बीएलओ घरी आल्यानंतर आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी. हा फॉर्म ऑनलाइनही भरता येणार आहे.





# शहरातील ३५० नाल्यांवरील अतिक्रमणे हटणार

## पहिल्याच पावसात तुंबलेल्या नाल्यांनंतर प्रशासन सतर्क; नैसर्गिक प्रवाह पुन्हा खुले करण्याचा निर्णय

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**यंदा पहिल्याच पावसामध्ये जुलैच्या सुरुवातीलाच पिंपरी-चिंचवड शहरातील नाले तुंबले होते. त्यामुळे नाले अरुंद करणाऱ्यांवर तसेच, बुजवणाऱ्यांवर महापालिकेच्या वतीने धडक कारवाई केली जाणार आहे. शहरातील साडेतीनशेवर नाल्यांचा प्रवाह खुला केला जाणार आहे. यासाठी सर्व नाल्यांचे सर्वेक्षण करून अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे आणि प्रवाहात अडथळा निर्माण करणारे सर्व अडसर हटविण्याची मोहीम हाती घेण्यात येणार असून, भविष्यात पावसाळ्यात पाणी साचण्याच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.**



### संबंधित विभागांना सूचना

याशिवाय, ज्या ठिकाणी नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह अडवण्यात आला आहे किंवा अतिक्रमणामुळे पाण्याचा निचरा होत नाही, अशा ठिकाणी तातडीने संयुक्त पाहणी करून आवश्यक ती कारवाई करण्यात येणार आहे. संबंधित विभागांना निश्चित कालमर्यादित अहवाल सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

मुसळधार पावसामुळे मोशी येथील कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत नऊ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. तर, काही जण जखमी झाले. त्याचदरम्यान या पावसामध्ये शहर परिसरातील पावसाळी गटारे, अनेक ठिकाणी नाले तुंबले होते. पवना आणि इंद्रायणी नदीला पूर आल्याने नदीकाठच्या परिसरामध्ये सांडपाणी आणि पावसाळी गटारे वाहून जाणाऱ्या वाहिन्यांमध्ये पाणी घुसले होते. हे पाणी नागरी भागामध्ये शिरले.

गावांचे रूपांतर उपनगरात आणि उपनगरांचे रूपांतर आता स्मार्ट सिटीत झाले आहे. पवना, मुळा आणि इंद्रायणी या तीन नद्यांच्या तीरांवर शहर वसले आहे. त्यामुळे उपनगरातील पाणी नद्यांकडे वाहून जाते. नैसर्गिक प्रवाह निर्माण होऊन नाले तयार झाले. शहरीकरणामध्ये यामधील अनेक नाले बांधकाम व्यवसायिकांनी गायब केले आहेत. त्या ठिकाणी टोलेजंग गृहप्रकल्प उभारण्यात आले आहेत. काही ठिकाणी नाले अरुंद करण्यात आले आहेत. काही ठिकाणी त्यावर बांधकामे कण्यात आली आहेत.

अनेक ठिकाणी नाल्याच्या प्रवाहात अडथळा येत असल्याने ते तुंबण्याचे प्रकार घडत आहेत. याबाबत महापालिकेने सर्वेक्षण केले होते. त्यामध्ये शहरातील सुमारे साडेतीनशे ठिकाणे आढळून आली आहेत. काही ठिकाणी नाल्यांवर बांधकामे आहेत. काही ठिकाणी नाल्यांचा प्रवाह अरुंद केला आहे. तर, काही ठिकाणी भूमिगत पाईप टाकून नाले बुजवण्यात आले आहेत. अशा ठिकाणांवर आता कारवाई केली जाणार आहे. त्यासंदर्भात वरिष्ठस्तरावर बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना कडक सूचना देण्यात आल्या आहेत. कोणत्याही परिस्थिती नाल्यावरील अतिक्रमण हटवण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत.

पावसाळ्यामध्ये नाले तुंबण्याचे प्रकार घडतात. या घटनांचा आणि कारणांचा शोध घेतला. त्यामध्ये सुमारे ३५० ठिकाणी वेगवेगळ्या माध्यमातून नैसर्गिक नाल्यांच्या प्रवाहावर परिणाम झाला आहे.

अशा ठिकाणी आता महापालिकेच्या वतीने कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे भविष्यात नाल्यांमुळे सार्वजनिक ठिकाणी पाणी तुंबण्याचे प्रकार घडणार नाहीत, असा दावा महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंबासे यांनी केला आहे.

# Priyadarshani School, Moshi Organized Interactive Drone Technology Workshop

**MahaEnews I PIMPRI-CHINCHWAD**

**Priyadarshani School, Moshi, successfully organized an interactive Drone Technology Workshop for the students of the grade 7 and 8 in collaboration with GDIOT Technology, Pune.**




The workshop was conducted by an expert trainer from GDIOT Technology, who introduced students to the fundamentals of drone technology, its working principles, components, and the latest advancements in the field. Students also gained insights into the wide-ranging applications of drones in agriculture, defence, disaster management, aerial photography, surveying, logistics, and environmental monitoring.

A live drone demonstration was the highlight of the programme, providing students with a practical understanding of drone operations and making the learning experience highly engaging and interactive. Students participated enthusiastically, asked insightful questions, and displayed keen interest in exploring this rapidly evolving technology.

The workshop aimed to nurture scientific curiosity, innovation, and problem-solving skills while encouraging students to explore future career opportunities in robotics, artificial intelligence, drone technology, and allied STEM fields.

The school management, Principals, and teaching staff appreciated the initiative for offering valuable hands-on exposure beyond the classroom and promoting experiential learning among students.

The programme concluded with a heartfelt vote of thanks to the trainers from GDIOT Technology, Pune, for conducting an enriching, informative, and memorable workshop that inspired students to embrace the technologies of the future.

# बदलत्या काळातील सिव्हिल इंजिनिअरिंग : कृत्रिम बुद्धिमत्तेची नवी उंची




मानवी संस्कृतीच्या विकासामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी (Civil Engineering) ची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. रस्ते, पूल, धरणे, इमारती, औद्योगिक संकुले आणि स्मार्ट शहरे यांसारख्या पायाभूत सुविधांमुळे देशाच्या आर्थिक प्रगतीला गती मिळाली आहे. पूर्वीच्या बांधकाम उद्योगामध्ये मानवी अनुभवावर आधारित निर्णय, कागदी नकाशे, मॅन्युअल स्ट्रक्चरल डिझाइन, साइट निरीक्षणासाठी प्रत्यक्ष उपस्थिती आणि पारंपरिक प्रकल्प व्यवस्थापन पद्धतींचा वापर केला जात असे. परिणामी, कामामध्ये विलंब, बांधकाम साहित्याचा अपव्यय, कामगार सुरक्षेतील मर्यादा आणि माहितीचे अपुरे डिजिटल व्यवस्थापन या समस्या मोठ्या प्रमाणावर जाणवत होत्या. त्यामुळे मोठ्या प्रकल्पांमध्ये वेळ, पैसा आणि मनुष्यबळ यांचा अपव्यय होत असे.

"बदल हा जगाचा शाश्वत नियम आहे" (Change is the only constant) या उक्तीप्रमाणे मानवी संस्कृतीच्या विकासासोबत विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये सातत्याने परिवर्तन होत आले आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) मुळे बांधकाम क्षेत्रात मोठी क्रांती घडत आहे. त्याचा प्रभाव स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रावरही स्पष्टपणे दिसून येत आहे. आधुनिक स्थापत्य अभियांत्रिकीने या बदलांचा सकारात्मक स्वीकार करून AI, डिजिटल तंत्रज्ञान आणि स्मार्ट व्यवस्थापन प्रणालींचा आपल्या कार्यपद्धतीत प्रभावी समावेश केला आहे. हा बदल केवळ तांत्रिक नसून संपूर्ण कार्यपद्धती, व्यवस्थापन आणि निर्णयप्रक्रियेत बदल घडवून आणणारा "Paradigm Shift" आहे.

**AI-आधारित बांधकाम उद्योग म्हणजे काय?**

AI-आधारित बांधकाम उद्योगामध्ये संगणकीय बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग (Machine Learning), डेटा ॲनालिटिक्स, रोबोटिक्स, ड्रोन, BIM (Building Information Modeling), IoT (Internet of Things) आणि ऑटोमेशन यांचा वापर करून बांधकाम प्रक्रिया अधिक अचूक, सुरक्षित, जलद आणि कार्यक्षम बनविली जाते.

AI प्रणाली मोठ्या प्रमाणातील माहितीचे विश्लेषण करून निर्णय घेण्यास मदत करतात. त्यामुळे प्रकल्प नियोजन, डिझाइन, गुणवत्ता नियंत्रण, खर्च व्यवस्थापन आणि देखभाल यामध्ये कार्यक्षमता मोठ्या प्रमाणावर वाढते.

## AI चे स्थापत्य अभियांत्रिकीतील प्रमुख उपयोग

**१. स्मार्ट डिझाइन आणि नियोजन**

AI-आधारित सॉफ्टवेअर विविध पर्यायांचे विश्लेषण करून सर्वोत्तम डिझाइन सुचवतात. त्यामुळे डिझाइनमधील त्रुटी कमी होतात, बांधकाम खर्चात बचत होते आणि वेळेची बचत होते. BIM तंत्रज्ञानामुळे संपूर्ण इमारतीचे डिजिटल मॉडेल तयार करून प्रकल्पाचे अचूक नियोजन करता येते.

**२. ड्रोन आणि रोबोटिक्सचा वापर**

ड्रोनच्या मदतीने साइट सर्वेक्षण, बांधकाम प्रकल्पाच्या प्रगतीचे निरीक्षण, सुरक्षा तपासणी तसेच दुर्गम किंवा धोकादायक ठिकाणांची मोजणी अधिक जलद आणि अचूकपणे करता येते. रोबोटिक्सच्या साहाय्याने विटांचे बांधकाम, काँक्रीट प्रिंटिंग आणि धोकादायक ठिकाणी काम करणे शक्य झाले आहे.

**३. पूर्वानुमानाधारित देखभाल (Predictive Maintenance)**

AI-आधारित प्रणाली बांधकाम यंत्रसामग्रीमधील संभाव्य बिघाड आधीच ओळखू शकतात. सेन्सर्स आणि डेटा विश्लेषणाच्या साहाय्याने यंत्रांच्या कार्यक्षमतेवर सतत लक्ष ठेवले जाते. त्यामुळे आवश्यक देखभाल वेळेवर करता येते आणि अनपेक्षित बिघाड टाळता येतात.

यामुळे:

- यंत्रसामग्री अचानक बंद पडण्याचे प्रमाण कमी होते.
- देखभाल व दुरुस्तीचा खर्च कमी होतो.
- यंत्रसामग्रीचे आयुष्य आणि कार्यक्षमता वाढते.
- प्रकल्पातील विलंब कमी होऊन कामाचा वेग वाढतो.

**४. कामगार सुरक्षा सुधारणा**

AI-आधारित कॅमेरे आणि सेन्सर्स कामगारांच्या हालचालींवर सतत लक्ष ठेवतात. संभाव्य अपघातांचा अंदाज घेऊन त्वरित सूचना दिल्या जातात. त्यामुळे बांधकामस्थळी अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होते.

**५. प्रकल्प व्यवस्थापन आणि वेळेचे अनुकूलन (Project Scheduling & Time Optimization)**

स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये "Time is Money" ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. प्रकल्प पूर्ण होण्यास होणारा विलंब म्हणजे खर्चवाढ, संसाधनांचा अपव्यय आणि आर्थिक नुकसान होय.

AI प्रणाली संभाव्य विलंबाची कारणे आधीच ओळखून त्यावर पर्यायी उपाय सुचवतात. त्यामुळे प्रकल्प वेळेत पूर्ण होतो तसेच अनावश्यक खर्च आणि दंडात्मक शुल्क कमी होते.

**६. शाश्वत आणि हरित बांधकाम**

AI ऊर्जेचा वापर, पाणी व्यवस्थापन आणि पर्यावरणीय परिणामांचे विश्लेषण करून पर्यावरणपूरक आणि शाश्वत बांधकामाला चालना देते.

## आव्हाने

AI तंत्रज्ञान स्वीकारताना काही महत्त्वाची आव्हानेदेखील आहेत.

**१. प्रारंभिक गुंतवणूक**

AI-आधारित प्रणाली, सेन्सर्स आणि अत्याधुनिक सॉफ्टवेअरची अंमलबजावणी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रारंभिक गुंतवणूक आवश्यक असते. त्यामुळे लहान व मध्यम बांधकाम कंपन्यांना या तंत्रज्ञानाचा अवलंब करणे तुलनेने कठीण ठरते.

**२. कुशल मनुष्यबळाची कमतरता**

AI, BIM आणि डेटा विश्लेषण साधनांचा प्रभावी वापर करण्यासाठी प्रशिक्षित आणि कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. मात्र, अशा तज्ज्ञ मनुष्यबळाची कमतरता अनेक प्रकल्पांमध्ये जाणवते.

**३. डेटा सुरक्षा आणि गोपनीयता**

बांधकाम प्रकल्पांमधील मोठ्या प्रमाणातील डिजिटल माहितीचे व्यवस्थापन करताना डेटा सुरक्षा, गोपनीयता तसेच सायबर हल्ल्यांचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सायबर सुरक्षेवर विशेष भर देणे आवश्यक आहे.

**४. मानसिकता आणि बदलाचा स्वीकार**

पारंपरिक पद्धतीने काम करणारे अनेक अभियंते आणि कामगार नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याबाबत साशंक असतात. तांत्रिक भीती किंवा बदलास विरोध करण्याची मानसिकता ही AI च्या व्यापक वापरातील एक महत्त्वाची अडचण आहे.

**५. ग्रामीण भागातील मर्यादा**

ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये इंटरनेट सुविधा, डिजिटल पायाभूत व्यवस्था आणि तांत्रिक साधनांची मर्यादा असल्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आव्हानात्मक ठरते.

भारतातील परिस्थिती आणि संधी

भारतात स्मार्ट सिटी, मेट्रो, एक्सप्रेस-वे, जलसंपदा प्रकल्प आणि इतर मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये AI-आधारित तंत्रज्ञानाचा वापर झपाट्याने वाढत आहे. अनेक बांधकाम कंपन्या BIM, ड्रोन सर्वेक्षण, ऑटोमेशन आणि डेटा ॲनालिटिक्स यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करत आहेत.

या पार्श्वभूमीवर स्थापत्य अभियंत्यांसाठी करिअरच्या अनेक नव्या संधी उपलब्ध होत असून भविष्यात पुढील क्षेत्रांना विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे.

स्थापत्य अभियंत्यांसाठी उदयोन्मुख करिअर संधी

१. BIM Specialist (बीआयएम विशेषज्ञ)

इमारती व पायाभूत सुविधा प्रकल्पांचे डिजिटल मॉडेल तयार करणे, त्यांचे विश्लेषण करणे आणि विविध विभागांमध्ये समन्वय साधणे.

२. Project Data Analyst (प्रकल्प डेटा विश्लेषक)

बांधकाम प्रकल्पांमधून उपलब्ध होणाऱ्या डेटाचे विश्लेषण करून निर्णयप्रक्रिया अधिक परिणामकारक बनविणे आणि कार्यक्षमता वाढविणे.

३. Smart Infrastructure Engineer (स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर अभियंता)

AI, IoT आणि सेन्सर तंत्रज्ञानाचा वापर करून बुद्धिमान, सुरक्षित आणि शाश्वत पायाभूत सुविधा विकसित करणे.

४. Drone Survey Specialist (ड्रोन सर्वे विशेषज्ञ)

ड्रोनच्या सहाय्याने भू-सर्वेक्षण, साइट मॅपिंग, प्रगती निरीक्षण आणि अचूक मोजमाप करणे.

५. AI-enabled Project Manager (AI-आधारित प्रकल्प व्यवस्थापक)

AI साधनांचा वापर करून वेळ, खर्च, गुणवत्ता आणि संसाधनांचे प्रभावी नियोजन व व्यवस्थापन करणे.

६. Digital Construction Manager (डिजिटल कन्स्ट्रक्शन मॅनेजर)

बांधकाम क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाची अंमलबजावणी, समन्वय आणि व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडणे.

## निष्कर्ष

पारंपरिक बांधकाम उद्योगातून AI-आधारित बांधकाम उद्योगाकडे होणारा बदल हा औद्योगिक क्रांतीइतकाच महत्त्वपूर्ण मानला जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे बांधकाम प्रक्रिया अधिक सुरक्षित, अचूक, जलद, किफायतशीर आणि शाश्वत बनत आहे.

भविष्यात AI हे केवळ बांधकाम उद्योगाचे सहाय्यक तंत्रज्ञान राहणार नसून उद्योगाच्या परिवर्तनाचे प्रमुख केंद्रबिंदू ठरणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही स्थापत्य अभियंत्यांची जागा घेणारी नसून त्यांच्या कार्यक्षमतेत, अचूकतेत, उत्पादकतेत आणि निर्णयक्षमतेत वाढ करणारी तांत्रिक क्रांती आहे.

म्हणूनच आजच्या आणि उद्याच्या स्थापत्य अभियंत्यांनी AI, BIM, डेटा ॲनालिटिक्स, डिजिटल कन्स्ट्रक्शन आणि स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर यांचे ज्ञान आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. याचबरोबर अभियंते, विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्राने या तांत्रिक परिवर्तनाचा सकारात्मक स्वीकार करून नव्या कौशल्यांचे संपादन करणे आवश्यक आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर केल्यास भारताचा बांधकाम उद्योग अधिक सुरक्षित, शाश्वत, कार्यक्षम आणि भविष्याभिमुख होईल.

लेखक
**प्रा. मुकुंद चौगले**
जी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी, पुणे

**श्री. प्रवीण कोल्हे**
उपसचिव तथा अधीक्षक अभियंता,
जलसंपदा विभाग (WRD),
महाराष्ट्र शासन


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station